# महाराष्ट्र शासन

<u>तात्काळ</u>

क्रमांक : किसनि-२०१९/प्र.क्र.२०/११-अे,
कृषि,पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व
मत्स्यव्यवसाय विभाग, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय विस्तार,
मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :-२७ फेब्रुवारी,२०१९

प्रति,

१. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय पुणे
२. सर्व विभागीय आयुक्त,
३. सर्व जिल्हाधिकारी,
४. सर्व जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी.

**विषय :-** प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (PM-KISAN) योजनेसंदर्भात सूचना.

**संदर्भ :-**१) कृषि व पदूम विभाग, शासन परिपत्रक क्रमांक किसंयो-२०१९/प्र.क्र.२०/११-अे, दि.०४.०२.२०१९
२) मा.सचिव (कृषि) यांचे पत्र क्र.किसयो-२०१९/प्र.क्र.२०/११-अे, दि.०९.०२.२०१९

केंद्र शासन पुरस्कृत **प्रधानमंत्री किसान सन्मान निधी** (PM-KISAN) योजनेची अंमलबजावणी करण्यासंदर्भात शासनाने यापूर्वी वरील संदर्भ क्र.१ व २ अन्वये सविस्तर सूचना दिल्या आहेत.

योजनेअंतर्गत केंद्र शासनाच्या संकेतस्थळावर पात्र शेतकऱ्यांची माहिती भरताना विशेषत: त्यांचे नाव, आधार क्रमांक, बँकेचे नाव, खाते क्रमांक व IFSC कोड आणि तालुका/गावाचा कोड यासंदर्भातील अनिवार्य माहिती भरली नसल्यामुळे किंवा चूकीची माहिती भरल्यामुळे शेतकऱ्यांची माहिती त्रुटीपूर्ततेकरीता ऑनलाईन स्वरुपात परत आली आहे. सदरच्या संकेतस्थळावर पात्र शेतकऱ्यांची माहिती भरत असतांना खालीलप्रमाणे काटेकोरपणे काळजी घेण्यात यावी.

१. यापुढे पात्र लाभार्थ्यांची माहिती एकत्रित करताना परिशिष्ट “अ” मधील ओळखपत्राचा प्रकार म्हणून आधार कार्ड नमूद करावे. आधार कार्ड उपलब्ध नसल्यास आधार कार्ड नोंदणी क्रमांक नमूद करावा. **इतर कोणताही ओळखपत्राचा प्रकार नमूद करु नये.** जी माहिती त्रुटीपूर्ततेकरीता परत आली आहे त्यामध्ये सुध्दा इतर ओळखपत्राऐवजी आधार क्रमांक नमूद करावा.

२. पात्र खातेदार शेतकऱ्यांचे ८-अ खातेपुस्तकावर नमूद केलेले नाव व बँक खात्यावरील नाव एकच असल्याची खात्री करावी.

३. बँक खात्याच्या पासबुकावर पहिल्या पृष्ठाची छायांकित प्रत घेण्यात यावी जेणेकरुन त्या पृष्ठावरील नमूद शेतकऱ्याचे नाव, बँकेचे नाव, शाखा, खाते क्रमांक, IFSC कोड आणि आधार कार्डावरील तपशील याची पडताळणी करुन अचूकपणे संकेतस्थळावर माहिती

नोंदविणे शक्य होईल.

४. संकेतस्थळावर माहिती अपलोड करण्यापूर्वी शेतकऱ्यांची आधार कार्डावरील नावे, आधार क्रमांक, बँक खाते क्रमांक व IFSC कोड इत्यादी महत्वपूर्ण माहितीची अचूक पडताळणी करण्यात यावी. याबाबतची सर्वस्वी जबाबदारी ही ग्रामस्तरावरील संबंधित अधिकारी/ कर्मचाऱ्याची असेल.

५. माहिती अपलोड करतांना जिल्हा कोड, उपजिल्हा कोड, तालुका कोड व गाव कोड अचूकपणे भरला असल्याबाबतची खात्री करावी.

६. **परिशिष्ट "अ" (सुधारीत) मधील अनिवार्य माहिती (Mandatory Field) दि.०९.०२.२०१९ रोजी निर्गमित केलेल्या पत्रातील सुचनांनुसार काटेकोरपणे भरण्यात यावी.**

७. **या योजनेचा दुसरा हप्ता देण्याकरिता पात्र खातेदार शेतकऱ्याकडे आधार कार्ड व आधार संलग्नित बँक खाते असणे अनिवार्य असून** यापूर्वी पात्र झालेले लाभार्थी तसेच नव्याने भरण्यात येणाऱ्या लाभार्थ्यांचे आधार कार्ड अत्यावश्यक असेल. तसेच अन्य कोणतेही ओळखपत्र ग्राह्य धरले जाणार नाही.

८. ज्या शेतकऱ्यांची माहिती विविध कारणांमुळे त्रुटीपूर्ततेकरीता जिल्हा किंवा तालुका लॉगईन वर परत आलेली आहे. सदर माहिती दुरुस्त करुन तात्काळ पोर्टलवर अपलोड करावी.

९. या योजनेंतर्गत लाभ मिळालेल्या सर्व शेतकऱ्यांची यादी (शेतकऱ्यांचे बँक खाते क्रमांक व आधार क्रमांक वगळून) संबंधित ग्रामपंचायत स्तरावर प्रदर्शित करण्यात यावी.

१०. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (PM-KISAN) योजनेची उपरोक्त बाबींसह प्रसारमाध्यमांव्दारे व्यापक प्रचार व प्रसिध्दी करण्यात यावी. तसेच **विशेष मोहिम** घेवून सर्व पात्र शेतकऱ्यांची माहिती संकेतस्थळावर अपलोड करावी.

तरी, वरील सूचनांचे अत्यंत काटेकोरपणे पालन करुन त्याप्रमाणे तात्काळ कार्यवाही करण्यासाठी आपल्या अखत्यारीतील सर्व संबंधित नोडल व अन्य अधिकारी आणि कर्मचारी यांना विनाविलंब सूचना देण्यात याव्यात.

आपला,

(एकनाथ डवले)
सचिव, (कृषि) महाराष्ट्र शासन

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :-

१) मा.मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक,मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.

२) निवड नस्ती- ११/अे.